साप्ताहिक

# परळी परिसर

* परळी वैजनाथ * सोमवार, दि. ०४ मार्च २०२४ * पाने-४ * ₹२/- www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## परळीत लवकरच भव्य क्रीडा संकुल उभारणार - ना.धनंजय मुंडे

### ग्रामीण मधून चांदापुर तर परळी शहरातून जय श्रीराम संघ ठरले नामदार चषकाचे मानकरी

परळी वैद्यनाथ, (बातमीदार):- परळीची माती ही रत्नांची खाण आहे या मातीने महाराष्ट्र व देशाला अनेक क्षेत्रात विविध रत्ने दिली आहेत. क्रिकेट सह क्रीडा क्षेत्रातही परळीचे मोठे योगदान आहे. रणजी ट्रॉफीसाठी मराठवाड्याची स्वतंत्र टीम असली असती, तर परळी सह बीड जिल्ह्यातील अनेक खेळाडूंना त्याद्वारे आपली प्रतिभा राज्य, देश तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर सादर करण्याची संधी मिळाली असती; ती संधी मिळावी म्हणून दरवर्षी नाथ प्रतिष्ठानच्या माध्यमातून आपण क्रिकेट व अन्य क्रीडा स्पर्धांचे आयोजन करतो. याही वर्षी आपण वैद्यनाथ महाविद्यालयासमोरील या मैदानावर नामदार चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे भव्य आयोजन केले, परंतु पुढील वर्षी ही स्पर्धा स्वतंत्र भव्य स्टेडियम मध्ये होईल; यासाठी राज्य शासनाने सुमारे ६५ कोटी रुपये निधी देण्याचे मान्य केले असून परळीत येत्या



काही महिन्यातच सुसज्ज असे क्रीडा संकुल उभे केले जाईल. त्यामध्ये क्रिकेटसह अन्य क्रीडा प्रकारातील खेळांनाही सुसज्ज असे मैदान उभे करून देण्यात येणार असल्याची घोषणा राज्याचे कृषिमंत्री तथा परळीचे आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी येथे बोलताना केली. ना.धनंजय मुंडे अध्यक्ष असलेल्या नाथ प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या वतीने परळी वैद्यनाथ येथे मागील २५ जानेवारीपासून भव्य टेनिस बॉल डे-नाईट क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये परळी शहर तसेच मतदार संघातील ग्रामीण भागातील २६४ क्रिकेट संघांनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेचा अंतिम सामना आज हजारो क्रिकेट प्रेमींच्या उत्साहात खेळवला गेला व त्यानंतर आयोजित बक्षीस वितरण समारंभात धनंजय मुंडे बोलत होते. या समारंभास खास भारतीय क्रिकेट संघाचा स्टार फलंदाज युवराज सिंग तसेच बॉलिंग ची स्पीड मशीन म्हणून ओळख असलेला स्टार गोलंदाज जहीर खान यांची विशेष उपस्थिती होती. दोघांचेही नाथ प्रतिष्ठानच्या वतीने भव्य स्वागत करण्यात आले. यावेळी स्थानिक तरुणांनी एकच जल्लोष करत आपल्या लाडक्या खेळाडूंचे जोरदार स्वागत केले.

आपल्या शरीरात वाढत असलेल्या कॅन्सरवर मात करून युवराज सिंग ने देशासाठी अनेक रेकॉर्ड स्थापित केले युवराज सिंग आज प्रथमच परळीत आले असता वैद्यनाथ असलेल्या प्रभू वैद्यनाथांच्या चरणी युवराज सिंग यांना उदंड आयुष्य लाभो अशी प्रार्थना करत असल्याचेही धनंजय मुंडे यावेळी बोलताना म्हणाले.

मी देखील ग्रामीण भागातून टेनिस बॉल पासून क्रिकेट खेळण्याची सुरुवात केली. हळूहळू संधी उपलब्ध होत गेली आणि देशासाठी खेळायची मला

(उर्वरित पान ४ वर)

## महाशिवरात्री यात्रेची श्री वैद्यनाथ मंदिरात तयारी युद्धपातळीवर सुरू

परळी वैजनाथ, (बातमीदार):- बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ओळख असलेल्या परळी येथील प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या महाशिवरात्री निमित्त येत्या शुक्रवार (दि.८) पासून भरणाऱ्या यात्रा महोत्सवाची तयारी युद्धपातळीवर सुरू आहे.




यानिमित्ताने मंदिर व परिसरात रंगरंगोटी, दर्शन व्यवस्था, मंडप उभारणी, सी.सी.टी.व्ही. यांसह विविध कामे केली गेली आहेत. यात्रेनिमित्त दर्शनाला येणाऱ्या भाविकांची गैरसोय होवू नये म्हणून विविध उपाययोजना देवस्थान संस्थेच्या वतीने केल्या जात आहेत. गुरुवारी (दि.७) वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची पूजा होवून दर्शनाला सुरूवात होणार आहे. स्त्री-पुरुष भाविकांच्या वेगवेगळया रांगा मंदिरात असणार आहेत. शिवाय शंभर देणगी देवून विशेष दर्शन पासचीही व्यवस्था केली आहे. भाविकांना उन्हाचा त्रास होवू नये म्हणून दर्शन मार्गावर कापडी मंडप टाकला गेला आहे. शिवाय पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. संपूर्ण यात्रा उत्सव व दर्शन व्यवस्थेवर सी.सी.टी.व्ही.कॅमेऱ्याद्वारे लक्ष ठेवले जाणार आहेत. यासाठी ८० वर सी.सी.टी.टी.व्ही.कॅमेरे मंदिर व परिसरात लावण्यात आले आहेत. शुक्रवारी सायंकाळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते ज्योतिर्लिंगाची रूद्राभिषेक पूजा होणार आहे. यात्रा उत्सवाची तयारी अंतिम असल्याची माहिती सुत्रांनी दिली. दरम्यान, यात्रा उत्सव यशस्वी पार पाडण्यासाठी देवस्थान संस्थेचे विश्वस्त राजेश देशमुख, सचिव प्रा.बाबासाहेब देशमुख यांच्यासह इतर विश्वस्त, कर्मचारी परिश्रम घेत आहेत. दरम्यान, यात्रेच्या पार्श्वभूमीवर मंदिर परिसरात चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येत आहे. ***

## वीज केंद्रातील संच क्र.४ व ५ च्या धूरवाहिण्या जमीनदोस्त

परळी वैजनाथ, (बातमीदार):- मराठवाड्याचे विकासतीर्थ म्हणून ख्याती पावलेल्या व या भागातील एकमेव औष्णिक विद्युत केंद्र असलेल्या परळी येथील औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील २१० वीज निर्मिती मेगावॉट क्षमता असलेल्या संच क्रमांक चार व पाचच्या धुरवाहिण्या शुक्रवारी व शनिवारी (दि.२९ फेब्रुवारी व १ मार्च) जमीनदोस्त करण्यात आल्या.



परळीच्या औष्णिक विद्युत केंद्राचे प्रतीक बनलेल्या तीन धुराच्या चिमण्यांपैकी एक चिमणी गेल्या सप्टेंबर २०२२ मध्ये जमीनदोस्त करण्यात आली होती व हा संच भंगारमध्ये काढण्यात आला होता. संच क्रमांक चार व पाच या दोन्ही संच भंगारमध्येच काढण्यात आले आहेत. यापूर्वी प्रत्येकी ३० मेगावॉट क्षमतेचे संच क्रमांक एक व दोन भंगार काढले होते. संच जुने झाल्यामुळे व या संचातून तयार होणाऱ्या वीजनिर्मिती खर्च अधिक होत असल्याने वीजनिर्मिती कंपनीने परळीतील संच क्रमांक एक ते पाच चे भंगार करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे जुन्य औष्णिक वीजनिर्मिती केंद्रातील पाचही संच काढले जात आहेत. एकेकाळी या पाचही संचाने मराठवाड्यासह महाराष्ट्रातील विविध भागात वीज पुरवठा करून व्यापार उद्योगाला चालना दिली होती. परळीतील हे औष्णिक वीजनिर्मिती मराठवाड्यातील एकमेव औष्णिक वीजनिर्मिती केंद्र होते. एकापाठोपाठ एक संचाच्या उभारणीमुळे परळीची महाऔष्णिक वीजनिर्मिती केंद्राकडे वाटचाल सुरू होती.*

## 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धात्मक उपक्रमात न्यू हायस्कूल शाळा तिसरी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धात्मक उपक्रमात येथील उर्जानगर वसाहतीतील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाची न्यू हायस्कूल शाळा परळी तालुक्यातून तिसरी आली आहे. गेल्या दोन महिन्यांपासून शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रभर हे अभियान राबविले जात आहेत. राज्यातील जिल्हा परिषदेच्या, स्थानिक स्वराज्य संस्था व खासगी शिक्षण संस्थांच्या सर्व माध्यमांच्या शाळा या उपक्रमात सहभागी झाल्या



आहेत. परळी तालुक्यातून कन्हेरवाडी केंद्रातून न्यू हायस्कूल शाळा प्रथम आली होती. त्यानंतर तालुक्यातून या शाळेला तिसरा क्रमांक मिळाला आहे. तालुक्यात मराठी व सेमी माध्यमांच्या शाळेत अग्रेसर असलेली, मोठी विद्यार्थी संख्या असलेली व सतत दहावीच्या निकालात विक्रम नोंदविणारी शाळा म्हणून न्यू हायस्कूल शाळा ओळखली जाते. गेल्या ३५ वर्षापासून कार्यरत असलेली ही शाळा तालुक्यातील शैक्षणिक क्षेत्रातील अग्रगण्य शाळा म्हणून प्रसिद्ध आहे. सामाजिक, शैक्षणिक उपक्रमांबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी शाळेत सतत विविध उपक्रम राबवले. 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' या स्पर्धेत न्यू हायस्कूल शाळेने सहभाग घेवून विविध उपक्रम प्रभावीपणे राबविले. परळी पंचायत समितीच्या गटसाधन केंद्राने निवडलेल्या तज्ज्ञ परीक्षकांमार्फत शाळेची दोन वेळा तपासणी झाली. कन्हेरवाडी केंद्रातून ही शाळा पहिली आली तर परळी तालुक्यातून तिसरी आली आहे.

याबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रकाशदादा सोळंके, सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण यांच्यासह सर्व संचालक, शालेय समितीचे अध्यक्ष नानासाहेब सोळंके, इतर सर्व सदस्य यांनी याबद्दल न्यू हायस्कूल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी, पालकांचे अभिनंदन केले आहे. दरम्यान, या स्पर्धेत न्यू हायस्कूल शाळेची निवड केल्याबद्दल पंचायत समितीचे गटविकास अधिकारी शिवाजीराव मुंडे, गटशिक्षणाधिकारी श्री कनाके यांच्यासह शिक्षण विस्तार अधिकारी अन्सारी मॅडम, श्री कराड यांचे शाळेचे मुख्याध्यापक बी.ए. नाईकनवरे, पर्यवेक्षक बालासाहेब राठोड व शिक्षकवृंदांनी आभार मानले आहेत. हा उपक्रम संस्थेच्या पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली, सर्व शिक्षक, विद्यार्थी, पालकांच्या मदतीने आम्ही यशस्वी करू शकलो असे मुख्याध्यापक श्री नाईकनवरे यांनी सांगितले. **

# महाराष्ट्र विद्यालय परळी तालुक्यात प्रथम

## राज्यस्तरीय सुंदर शाळा अभियानात शाळेची कामगिरी



परळी वैजनाथ, (बातमीदार):- राज्यातील सर्वच शाळेमध्ये शिक्षक,विद्यार्थी, पालक आणि समाज यांची शाळेप्रति उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी, शैक्षणिक गुणवत्तेसह, सामाजिक उपक्रमातून विद्यार्थी आणि शाळेची प्रगती व्हावी यासाठी राज्यभर भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेंतर्गत,'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा 'हे स्पर्धात्मक अभियान राबविण्यात आले होते.या अभियानात मागील ६ दशकापेक्षा अधिक काळापासून ज्ञानदानासह विविध सामाजिक उपक्रम राबवून शिक्षण क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केलेल्या महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्य विद्यालयाने सरस कामगिरी करत तालुक्यातून पहिला क्रमांक पटकावला आहे.

मुख्यमंत्री माझी शाळा-सुंदर शाळा या अभियानांतर्गत राज्यातील शाळेमधून शैक्षणिक गुणवत्तेसह अध्ययन-अध्यापन व प्रशासन यात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पर्यावरण संवर्धन, सामाजिक व व्यक्तिगत स्वच्छता, राष्ट्रीय एकात्मता, व्यवसाय शिक्षण मार्गदर्शन, कला व क्रीडा कौशल्याचा विकास आदींच्या केलेल्या कामगिरीवर राज्याभर हे अभियान राबविण्यात आले आहे. विविध उपक्रमांना गुणदान करत केंद्र स्तर व तालुका स्तर तपासणी संपन्न झाली असून परळी तालुक्यातील खाजगी व्यवस्थापनाच्या १३५ शाळेमधून तालुक्यातील महाराष्ट्र शिक्षण संस्था मोहा संचलित महाराष्ट्र माध्य व उच्च माध्य विद्यालयाने सर्व शाळेवर मात करत तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.राज्यस्तरीय या अभियान अंतर्गत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवल्याने या शाळेस राज्य शासनाकडून ३ लक्ष रुपयांचे बक्षीस देखील मिळणार आहे.

जाहिरातबाजी आणि दिखावा करण्याच्या शैक्षणिक स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाने केलेली ही कामगिरी ही सुत्य असून शाळेच्या या दैदिप्यमान यशात संस्थेचे सचिव एड.अजय बुरांडे व संचालक मंडळ यांचे मार्गदर्शन, सर्व विद्यार्थी, पालक, विविध सेवाभावी संस्था,शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य,सर्व माजी विद्यार्थी, शाळेचे प्राचार्य विनायक राजमाने, उपमुख्याध्यापक मुरलीधर बोराडे, पर्यवेक्षक सुरेंद्र हरदास, सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी याचा सर्वांच्या सहकार्य राहिले आहे. **

# राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याच्या स्मरणिकेचे प्रकाशन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- वीरशैव समाज परळी वैजनाथ व महाराष्ट्र वीरशैव सभा पुणे यांच्या प्रेरणेने वीरशैव विकास प्रतिष्ठान परळी वैजनाथ द्वारा सर्व पोटजातींसाठी आयोजित राज्यस्तरीय वीरशैव वधु-वर परिचय मेळावा रविवार दिनांक ०७ जानेवारी २०२४ रोजी श्री गुरुलिंग स्वामी मंदिर (बेलवाडी) परळी वैजनाथ येथे मोठ्या थाटामाटात आणि उत्साहात संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे स्मरणितीचे



उद्घाटन दि ३ मार्च रोजी गुरुलिंग स्वामी मठ संस्थान बेलवाडी येथे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महाराष्ट्र वीरशैव सभेचे बीड जिल्हाध्यक्ष दत्ताआप्पा ईटके, प्रमुख उपस्थिती माजी नगराध्यक्ष सोमनाथ आप्पा हालगे, वैद्यनाथ मंदिराचे विश्वस्त विजयकुमार मेनकुदळे, वैद्यनाथ गॅस डिस्ट्रीब्यूटर चे डॉ. श्रीपाद बुरकुले , श्री वक्रेश्वर मंदिरचे विश्वस्त चंद्रकांत आप्पा समशेटे,श्री गुरुलिंग स्वामी संस्थानचे बेलवाडी सचिव ऍड.गिरीश चौधरी, विश्वस्त शिवकुमार व्यवहारे ,श्री वक्रेश्वर मंदिराचे विश्वस्त नारायण आप्पा खके माजी मुख्याध्यापक रंगनाथ आप्पा खके गुरुजी, विकास प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्याम भाऊ बुद्रे, सचिव सुधीर फुलारी सर वैद्यनाथ बँकेचे संचालक प्रा. महेश्वर आप्पा निर्मळे प्रा. चंद्रशेखर खानापुरे , पत्रकार आत्मलिंग शेटे यांची प्रमुख उपस्थिती होती यावेळी महाराष्ट्र वीरशैव सभेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री दत्ताआप्पा ईटके गुरुजी यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन करण्यात आले श्री क्षेत्र कपिलधार देवस्थानच्या अध्यक्षपदी श्री सोमनाथ आप्पा हालगे यांची निवड झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमासाठी वधू-वर परिचय मेळाव्या संचलन समितीचे अध्यक्ष महादेव इटके उपाध्यक्ष शिवकुमार चौंडे सचिन स्वामी गजानन हालगे सौ उज्वला आलदे सचिव चंद्रकांत उदगीरकर सहसचिव प्रकाश खोत दत्तात्रय गोपनपाळे सौ कोमल बेलूरे उमाकांत पोपडे कोष्यधक्ष सुशील हारंगुळे दत्ता गोपनपाळे सहकोषाध्यक्ष सतीश रेवडकर ,महादेव आप्पा फडकरी एडवोकेट उमरदंड राजेश्वर तीळकरी इंजिनीयर अरविंद बेल्हाळे प्रा. उमाकांत कूरे सोमनाथ आप्पा पत्रावाळे जगदीश आप्पा मिटकरी सोमनाथ गोपानपाळे सर दीपक इटके बाळू राजमाने मन्मथ कापसे संजय कोरे रमाकांत गुजर महालिंगाआप्पा तीलकरी वीरभद्र सोरडगे श्रीहरीतोडकरी सोमनाथ नाईकवाडे ओपळे आप्पा आधी असंख्य समाज बांधव उपस्थित होते यावेळी कार्यक्रमाचे संचालन व प्रास्ताविक मंडळाचे उपाध्यक्ष सचिन स्वामी यांनी केले तर आभार प्रदर्शन सुशील हरंगुळे यांनी केली.

## सा.परळी परिसर

### ✻ प्रकट निवेदन ✻

रेग्यूलेशन ऑफ न्यूज पेपर्स (सेंट्रल रूल्स १९५६ नियम क्र.८) अन्वये, **साप्ताहिक परळी परिसर** वृत्तपत्राची मालकी व इतर तपशील संबंधी निवेदन.

| | |
|---|---|
| १) प्रकाशनाचे स्थळ | : ईश्वर निवास, घर नं.५३८, नाथचित्रमंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वै. जि.बीड, पिन-४३१५१५ (महाराष्ट्र) |
| २) प्रकाशनाचा प्रसिध्दी काळ | : साप्ताहिक (सोमवार) |
| ३) प्रकाशकाचे नांव | : एस.एल.वाकडे |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ईश्वर निवास, घर नं.५३८, नाथचित्रमंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वै. जि.बीड, पिन-४३१५१५ (महाराष्ट्र) |
| ४) मुद्रकाचे नांव | : एस.एल.वाकडे |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : न्यू सुधांशू प्रिंटर्स, नाथचित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वै.जि.बीड |
| ५) संपादकाचे नांव | : एस.एल.वाकडे |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : ईश्वर निवास, घर नं.५३८, नाथचित्रमंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वै. जि.बीड, पिन-४३१५१५ (महाराष्ट्र) |

वृत्तपत्राचे मालकी ज्याच्याकडे आहे अशी व्यक्ती व एकूण भांडवलाच्या एक टक्क्याहून अधिक भागधारक करणारे भागधारक त्यांची नावे व पत्ते.

विश्वस्ताचे नांव : **एस.एल.वाकडे**
ईश्वर निवास, घर नं.५३८, नाथचित्रमंदिरमागे,
शिवाजीनगर, परळी वै. जि.बीड,
पिन-४३१५१५ (महाराष्ट्र)

मी **एस.एल.वाकडे** याद्वारे जाहीर करते की, वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे खरा आहे.

दिनांक : ०४ मार्च २०२४

**एस.एल.वाकडे**
प्रकाशकाची स्वाक्षरी

# जन्म नोंदणी प्रमाणपत्र देण्यासाठी घरपट्टी, नळपट्टी वसूली सक्ती करू नका-बहादूरभाई




परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळीतील नागरिक आपल्या पाल्यांचे जन्म नोंदनी प्रमाण पत्र प्राप्त करण्यासाठी मालमत्तेवरील घरपट्टी, नळपट्टीची थकबाकी भरणे नगरपालिकेने बंधनकारक केले आहे ती सक्तीची वसुली आपल्या कार्यालयाने त्वरित थांबून जन्म नोंदणी व जन्म प्रमाणपत्र पाल्यांना द्यावे अशी मागणी परळी शहर काँग्रेसच्या वतीने शहराध्यक्ष सय्यद हनिफ सय्यद करीम (बहादुर)व त्यांच्या शिष्टमंडळाने न.प. मुख्याधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याबाबत परळी नगरपरिषदेला दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की परळीतील नागरिक आपल्या पाल्यांचे जन्म नोंदनी प्रमाण पत्र साठी अर्ज करीत आहेत, त्यांना त्याच्या मालमत्तेवरील थकबाकी भरणे बंधनकारक आपले कार्यलयाने केले आहे. सध्या शाळेत मुलांचे ॲडमिशन चालू होत असल्याने जन्म नोंदनी प्रमाणपत्राची पल्याना आवश्यकता असल्याने आपण मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवू शकत नाहीत, काही गोर-गरीब लोक आहेत त्यांच्या कडे पैसे नसल्याने त्यांचे मुलांचे जन्म प्रमाणपत्र आपण देत नसल्याने त्या मुलांचे शैक्षणिक नुकसान आपण करू शकत नाहीत, आपणास वसूली साठी आणखीन दूसरे पर्याय आहेत.त्यानुसार वसूली करावी किंवा जो पैसे भरू शकत नसल्यास त्याच्या कडून तो काही दिवसानी भरेल असे लेखी घेऊन त्यांना जन्म नोंदनी प्रमाणपत्र अदा करावे अशी काँग्रेस पक्षाची या निवेदन द्वारे आपल्याकडे मागणी करण्यात आली आहे. काँग्रेस पक्षाने दिलेल्या या नियोजनाची तात्काळ दखल घेऊन जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र देऊन पाल्यांना सहकार्य करावे अशीही विनंती या नियोजनाद्वारे शहराध्यक्षसय्यद हनिफ सय्यद करीम (बहादुर) यांच्या शिष्टमंडळाच्या वतीने करण्यात आली यावेळी उपाध्यक्ष एतेशम्म खातीब, वैजनाथ गाडेकर, प्रवक्ते बद्दर भाई, अनुसूचित जाती जमाती अध्यक्ष दीपक शिरसाट, विधानसभा अध्यक्ष रणजित देशमुख, युवक अध्यक्ष अलीम भाई,अमजद भाई अल्पसंख्याक युवक अध्यक्ष रसूल खान आधी काँग्रेस पदाधिकारी उपस्थित होते. ***

(पान १ वरुन)............... **ना.धनंजय मुंडे**

संधी मिळाली. ग्रामीण भागाच्या मातीतूनच योग्य वेळी योग्य संधी मिळाल्याने मोठे खेळाडू निर्माण होत असतात. त्यामुळे माझे मित्र धनंजय मुंडे यांच्यासारख्या नेत्यांनी स्थानिक प्रतिभावान खेळाडूंना योग्य मंच उपलब्ध करून दिल्यानेच ग्रामीण मातीतून युवराज सिंग आणि झहीर खान सारखे खेळाडू घडत असतात असे गौरव उद्गार भारताचे माजी क्रिकेटपटू युवराज सिंग यांनी काढले. मी अहमदनगर जिल्ह्याच्या श्रीरामपूर मधून टेनिस बॉल पासूनच सुरुवात केली आणि पुढे खेळत गेलो. आज परळीत येऊन ग्रामीण भागात क्रिकेटचे एवढे भव्य आयोजन पाहून मला अतिशय आनंद झाला. परळीत खेळले जाणारे हे क्रिकेट एक दिवस देशात आणि देशाबाहेर नक्कीच पोहोचेल, असा मला विश्वास आहे, असे मत यावेळी भूतपूर्व भारतीय क्रिकेटर जहीर खान यांनी व्यक्त केले. गेल्या २५ जानेवारीपासून परळी वैद्यनाथ शहरात धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या नामदार चषक टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या माध्यमातून तब्बल ३५०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. ही माझ्यासाठी संयोजक म्हणून खूप मोठी बाब आहे, तसेच या भव्य स्पर्धेचे आयोजन करण्यामध्ये मला अनेकांचे सहभागी लाभले त्या सगळ्यांचेच मी या माध्यमातून आभार मानतो, असे मत यावेळी संयोजकांच्या वतीने जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे यांनी आपल्या प्रास्ताविकात मांडले. दरम्यान नामदार चषक क्रिकेट स्पर्धेमध्ये ग्रामीण व शहर असे दोन वेगवेगळे फायनल खेळवण्यात आले. ग्रामीण मध्ये चांदापूर हा संघ विजेता तर शिवबा गोपीनाथ गड हा संघ उपविजेता ठरला तसेच शहर मध्ये जय श्रीराम संघ विजेता तर जे के सी सी हा संघ उपविजेता ठरला. विजेत्या संघास एक लाख रुपये व ट्रॉफी तसेच उपविजेत्या संघास ५१ हजार रुपये व ट्रॉफी असे बक्षीस ना.धनंजय मुंडे, युवराज सिंह, झहीर खान यांसह मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. या समारंभास ना. धनंजय मुंडे यांच्यासह भूतपूर्व भारतीय क्रिकेटर युवराज सिंह, भूतपूर्व भारतीय क्रिकेटर जहीर खान, जिल्हा परिषदेचे माजी गटनेते अजय मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वाल्मिक अण्णा कराड, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष तुळशीराम पवार, परळीचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, अंबाजोगाई चे तालुकाध्यक्ष तानाजी देशमुख, युवा नेते अभय मुंडे, सूर्यभान नाना मुंडे, प्रा. मधुकर आघाव, माणिकभाऊ फड यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या समारंभात प्लेअर ऑफ द सिरीज, मॅन ऑफ द मॅच, बॅटिंग, बोलींग, अंपायर आदी सर्वांचाच सन्मान करण्यात आला.

आयोजकांच्या वतीने ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी अभय मुंडे, व्यंकटेश मुंडे, सुशील कराड, नाथ प्रतिष्ठानचे सचिव नितीन मामा कुलकर्णी, प्रणव परळीकर, अविनाश गवळी, प्रा. अजय जोशी, शेख मुसा, सय्यद मुस्तफा, उमेश नागरगोजे, बालाजी वाघ, विष्णू गीते, सुरेश गीते, बिलाल हुसेन, हाजी बाबा यांसह आदींनी परिश्रम घेतले.

**पुढील वर्षी मतदारसंघातील ७०० खेळाडूंची निवड करून परळी प्रीमियर लीग आयोजित करणार - धनंजय मुंडे**

यावर्षी या स्पर्धेच्या माध्यमातून सुमारे साडेतीन हजार खेळाडूंनी क्रिकेटचा आनंद लुटला. यापैकी परळी मतदारसंघातल्या उत्कृष्ट खेळ दाखवलेल्या ७०० खेळाडूंची निवड करून २० संघांच्या माध्यमातून या खेळाडूंचा लिलाव करून पुढील वर्षी परळी प्रीमियर लीग या क्रिकेट स्पर्धेचे आयोजन याहीपेक्षा भव्य स्वरूपात करणार असल्याचीही घोषणा धनंजय मुंडे यांनी यावेळी केली. **

संपादकीय...

# 'विकासतीर्थ' भंगारात...

**–० सुविचार ०–**
विहीर कोरडी पडेपर्यंत आपल्याला पाण्याची किंमत कळत नाही.

मराठवाड्याच्या विकासाचा एक भाग म्हणून मराठवाड्यात औष्णिक वीज निर्मिती केंद्र उभारण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला. योग्य भौगोलिक परिसर, वीज केंद्रास लागणाऱ्या कोळशाची वाहतूक करण्यासाठी रूंद रेल्वे मार्गाची सोय, मुबलक पाणी या सर्व जमेच्या बाबींमुळे मराठवाड्याच्या केंद्रस्थानी बीड जिल्ह्यात परळी वैजनाथ येथे हे वीज निर्मिती केंद्र उभारण्यावर शिक्कामोर्तब करण्यात आले. २९ मे १९६६ ला महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री व तत्कालीन संरक्षणमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते शहरात गंगाखेड मार्गावर दोनशे चाळीस हेक्टर शेतजमीनीवर ३० मेगावॅट क्षमतेच्या मराठवाड्यातील पहिल्या औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या कामाला सुरवात करण्यात आली. आजच्या भारत हेवी इलेक्ट्रीक लिमिटेड (भेल) या सरकारी कंपनीच्या मदतीने या संचांच्या उभारणीचे काम सुरू झाले. तेंव्हा हेवी इलेक्ट्रीकल या नावाने ही कंपनी ओळखली जात होती. त्यावेळी वीज निर्मिती संच उभारण्यासाठी लागणारी यंत्रसामुग्रीही परदेशातून आणावी लागत असे. या संचातील बाष्पक व इतर कांही यंत्रसामुग्री 'फ्रॅन्कोटोसी' या इटालीयन कंपनीकडून मागवण्यात आली तर जनित्रे हे भेलचेच लावण्यात आले. या संचाच्या उभारणीचे काम नोव्हेंबर १९७१ ला पूर्ण झाले तर १५ नोव्हेंबर १९७१ ला या संचातून प्रत्यक्ष वीज निर्मितीला सुरवात झाली. त्यावेळी जेष्ठ केंद्र अधिष्ठाता एस.पी.कडूसकर यांच्या देखरेखीखाली वीज केंद्राचे काम सुरू झाले होते. या संचातून तयार होणारी वीज १३२ केव्ही उच्च दाबाच्या वाहिनीद्वारे त्या काळात बीड, परभणी, नांदेड आदी जिल्ह्यांसह राज्यात इतर ठिकाणी वितरीत करण्यात आली. परळीच्या वीज निर्मिती केंद्रातून तयार झालेल्या वीजेने मराठवाड्याची वीजेची गरज भागली आणि मराठवाडा प्रकाशमय केला. पहिल्याच वर्षी या संचातून ३५ दशलक्ष युनीट वीजेची निर्मिती झाली. त्यानंतर याच संचाचा विस्तार करून आणखीन ३० मेगावॅट क्षमतेचा दुसरा संच येथे कार्यान्वित करण्यात आला. त्याचे काम वर्षभरात पूर्ण होवून मे १९७२ ला याही संचातून प्रत्यक्ष वीज निर्मितीला सुरवात झाली. त्यानंतर राज्यातील वीजेची वाढती मागणी लक्षात घेवून येथील वीज निर्मिती केंद्राचा विस्तार करण्यात आला. २१० मेगावॅट क्षमता असलेल्या संच क्रमांक तीनच्या उभारणीला ऑक्टोबर १९८० ला सुरूवात झाली. तेवढ्या क्षमतेचा संच क्रमांक चार मार्च १९८५ ला सुरू झाला तर डिसेंबर १९८७ संच क्रमांक पाचच्या उभारणीचे काम हाती घेतले गेले. २०१० च्या शतकाच्या प्रारंभी २५० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक सहा त्यानंतर टप्प्याटप्प्याने तेवढ्याच क्षमतेच्या संच क्रमांक सात व आठची उभारणी करण्यात आली. या सर्व संचामुळे परळी औष्णिक वीजनिर्मिती केंद्र महाविज निर्मिती केंद्र म्हणून ओळखले जावू लागले व येथील सर्व वीजनिर्मिती केंद्राची क्षमता १४४० मेगावॅट एवढी झाली.

आणखी पाच–दहा वर्षे चांगल्या प्रकारे चालू शकतील अशी स्थिती असतानाही केंद्रातील ३० मेगावॅटचे दोन्ही संच बंद केले गेले. याच वेळी पाणी टंचाई व विजेची मागणी नसल्यामुळे केंद्रातील इतरही संच बंद ठेवले गेले. पुढे डिसेंबर २०१९ मध्ये २१० मेगावॅट क्षमतेचे तिन्ही संच कायमस्वरूपी बंद करण्याचा निर्णय झाला. विजेचा उत्पादन खर्च अधिक, जुने होणे अशी कारण यासाठी दिली गेली. पुढे ३० मेगावॅटचे दोन्ही संच भंगारमध्ये काढले. त्यानंतर २१० मेगावॅट एवढी क्षमता असलेला संच क्रमांक तीनही भंगार मध्ये काढला गेला. या संचाची शेवटची खूण असलेली धुरवाहिनी (चिमणी) जीची उंची सुमारे एकशे वीस फुट होती, ती सप्टेंबर २०२२ मध्ये जमीनदोस्त करण्यात आली तर कालच्या गुरुवारी व शुक्रवारी (दि.२९ फेब्रुवारी व १ मार्च २०२४) प्रत्येकी २१० मेगावॅट क्षमता असलेले संच क्रमांक चार व पाचच्या धूरवाहिन्याही जमीनदोस्त करण्यात आल्या. याची उंची अनुक्रमे १८० व २१० मीटर एवढी होती. हे दोन्ही संच भंगारमध्ये काढले गेले आहेत.

आपल्या विजेने कधी काळी मराठवाड्याच्या व्यापार उद्योगाला चालना देणाऱ्या, मागील कितीतरी दशके मराठवाडा उजळून काढणाऱ्या व मराठवाड्याचे विकासतीर्थ म्हणून ओळख मिळवणाऱ्या परळी औष्णिक वीज केंद्रातील जुने संच रुपी वैभव नष्ट होत चालले आहे. यामुळे परळीकरांसह हे केंद्र उभारणी करणाऱ्या व या केंद्रात सेवा केलेल्या अधिकारी, कर्मचारी, कामगार व इतरांच्या मनाला चटका लागला आहे.

दरम्यान, भंगारमध्ये काढल्या गेलेल्या जुन्या औष्णिक वीजनिर्मिती केंद्राच्या जागेवर पुन्हा नवे संच उभारले जातात की या जागेवर सौरऊर्जा प्रकल्प थाटला जातो याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. ***

## ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणार–ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन

मुंबई (जि.मा.का.):– ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांचा सर्वांगीण विकास करणार असल्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांनी सांगितले. अखिल भारतीय वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष ह.भ.प. प्रकाश महाराज बोधले व यांच्या समवेत सर्व ह. भ. प. महंत शिवाजी महाराज, लक्ष्मण दशरथ मेंगडे, परमेश्वर गणपत बोधले, लक्ष्मण बाबुराव तकीक, विरुपाक्ष शिवाचार्य महास्वामी, राधाबाई ज्ञानोबा सानप यांच्यासह महाराष्ट्रातील अनेक संत महंत, कीर्तनकार आदिंनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व ग्रामविकास मंत्री गिरीष महाजन यांचा विधीमंडळात सत्कार केला व आभार व्यक्त केले.

ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा पायाभूत विकास होण्याकरिता शाश्वत वाढीव निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेला नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनादरम्यान मंजुरी देण्यात आली. या योजनेच्या माध्यमातून तीर्थक्षेत्रांना सुमारे २००० कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जात आहे. तसेच पर्यटन विभागामार्फत देखील प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत सुमारे १००० कोटी रुपयांचा निधी तीर्थक्षेत्रांच्या पर्यटन विकासासाठी उपलब्ध करुन दिला आहे.



प्रधानमंत्री नरेंद मोदी यांच्या 'भव्य काशी दिव्य काशी', बद्री केदार देवस्थान विकास, उज्जैन येथील महाकाल कॉरिडॉर, अयोध्यास्थित प्रभू श्रीराम जन्मभूमी मंदिर विकास या संकल्पनेच्या धर्तीवर महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील महत्वपूर्ण अशा 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेस मंजुरी देण्यात आली. आता 'ब' वर्गातील तीर्थक्षेत्रांना दोन कोटी ऐवजी पाच कोटींचा विकासनिधी उपलब्ध होत आहे. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविक आणि यात्रेकरुंना विविध सोयीसुविधा पुरविणे आवश्यक आहे. मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या तुटपुंज्या उत्पन्नामुळे या सोयीसुविधा पुरविणे शक्य होत नाही. म्हणून शासनाने ग्रामीण भागातील तिर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध करुन देण्याचा निर्णय नागपूर येथे झालेल्या बैठकीत मंत्रिमंडळाने घेतला. १६ नोव्हेंबर २०१२ नंतर २ कोटी या मर्यादेत निधी मंजूर केलेल्या तिर्थक्षेत्रांना नविन प्रस्तावित निकषाप्रमाणे ३ कोटी इतका निधी मंजूर करण्यात येत आहे, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी मंदिरापर्यंत रस्ते, पाणीपुरवठ्याची व्यवस्था करणे, स्वच्छतागृह, शौचालय, वाहनतळ, भक्त निवास, रस्त्यावरील दिवे आणि संरक्षण भिंत, वृक्ष लागवड करणे इत्यादी सुविधा या निधीतून उपलब्ध करुन दिल्या जातील.

**४८० तीर्थक्षेत्रांना होणार लाभ**

:– राज्यात 'ब' वर्ग दर्जा असलेली एकूण ४८० तीर्थक्षेत्र आहेत. या तीर्थक्षेत्रांना वाढीव निधीचा लाभ होणार आहे. तीर्थक्षेत्रास भेट देणाऱ्या भाविकांची संख्या ४ लाख असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक यांचे प्रमाणपत्र आवश्यक असते अशी माहिती यावेळी देण्यात आली.**

## आनंदाच्या लहरी...




आयुष्य म्हणजे नेमकं काय हे ज्याल कळालं तो माणूस मनमौजी असतो. तो कसलाच विचार करत नाही. ना परिस्थितीचा ना परिणामांचा, आयुष्य कसे सुदंर करता येईल या विचारांनी तो जगतं असतो. आपण नेहमीच म्हणतो की आयुष्य एकदाच मिळते पुन्हा नाही, तेव्हा काही करायचं ते याच जन्मात करून मोकळे व्हायचं म्हणून माणसं आयुष्यात जगण्याचा पुर्ण आनंद घेत असतात.मग हा आनंद कशात असतो? आपल्या चेहऱ्यावरचं हसु दुसऱ्याच्या चेहऱ्यावर देण्याच्या समाधानात आपला आनंद आहे. देण्यासारखे खुप असले तरी देवू शकत नाहीत, किमान हसण्याचा आनंद जरी देता आला तरी संबंधित व्यक्तीचे आयुष्य आनंदाने भरून जाते, चेहऱ्यावर हसु फुलते, सर्वच नाही पण जरास दुःख जरी दुर करता आले तरी त्या दुःखाच्या गर्दीत सुखाला जायला वाट मिळते. एकदा मिळालेल्या आयुष्याला सुंदर करायच आहे ना! मग गरजवंताला मदत करण्याचा प्रयत्न करावा एखाद्याची अडचण सोडवावी ओळख नसतानाही मदतीचा हात देण्यात जो आनंद आहे तो कुठेच नाही. कारण समोरचा आपल्या हाताचा आधार घेवून उभा हाणार असतो. आपल्या सहारे तो त्याची विस्कटलेली घडी सरळ करणार असतो. अडचणीतला माणूस मदत करणाऱ्याच्या डोळ्यात डोळे घालून जेव्हा बघतो ना तेव्हा त्याला मदत करणारा परमेश्वरच वाटतो कारण ज्याच्या मनात एखाद्याविषयी सहानुभूती वाटते आणि मागचा पुढचा विचारन करता त्याला आधार देतो तेव्हा तो त्याच्यासाठी परमेश्वरापेक्षा कमी नसतो. आपली वाट पाहिली गेली पाहिजे असे आयुष्य असावे. ज्याचं कोणी नाही त्याचा पाठराखा होवून त्याची काळजी घेतली गेली पाहिजे. ''मी आहे ना'' बस तुमच्या एव्हढ्याश्या सांगण्याने सुध्दा एखाद्याला जगण्याची उर्जा मिळते. चालणाऱ्या माणसाने थांबलं नाही तर धावलं पाहिजे.....मनातली ईच्छाशक्ती जागृत केली की माणूस आपोआप धावायला लागतो. मनातलं ओळखता आले म्हणजे मन आपसूकच हलके होते. प्रत्येक माणसाच्या मनावर काहीना काही दडपण असतेचं अशा माणसाच्या खांद्यावर हात ठेवून त्याचे अशु पुसून उमेदीचा मार्ग जरी दाखवला तरी त्याला जगण्याचं बळ मिळते. जातपात भेदभाव विसरून माणुसकीने जवळ करून हाकेला होकार देणारे व्यक्तीमत्व असले की सुंदर आयुष्य जगायला कोणाच्याही कौतुकाची गरज लागत नाही. दुःखाचे वाटेकरी नका होवू पण दुःखाच निवारण कसे होईल एव्हढ जरी केले तरी दुःखात असणाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाच्या किती किती लहरी उसळतील ! त्यांचे हसु त्यांचा आनंद पाहून स्वतःला किती समाधान वाटेल याची काही परिसीमाच नसते. एखाद्याच्या आयुश्याच्या कल्याणाला आपण जर कारणीभूत होणार असु तर यापेक्षा तो सुंदर सूर्योदय आणखी कोणता..?

– संग्राहक : शाहूराज येवते, परळी वैजनाथ.

'परळी परिसर' हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
RNI No.-MAHMAR/2017/74640 | Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 | (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) | www.parliparisar.com

# महासंस्कृती महोत्सवात अभिलिप्सा पंडा यांच्या ‘हर हर शंभो’ गाण्याला मोठा प्रतिसाद

बीड (जिमाका):- जिल्ह्यातील परळी शहरात श्री. वैद्यनाथ ज्योतिर्लिंग आहे. तसेच मार्च महिन्यात काही दिवसानंतर महाशिवरात्री आहे. तरी या पार्श्वभूमीवर चंदीगड विद्यापीठाची टॉपर असलेली गायिका अभिलिप्सा पणडा यांचे भगवान शंकरावरील अनेकानेक गाणे प्रसिद्ध असून आज ‘हर हर शंभो’ हे गाणे आपल्या अनोख्या शैलीत सादर केल्याने परिसर भक्तिमय वातावरणात न्हावून निघाला तर इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी डान्स ग्रुप दिल्ली शो या कार्यक्रमाला प्रेक्षकांनी पसंतीसह दाद दिली.

छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावरील महासंस्कृती महोत्सवास खासदार प्रितम मुंडे, जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे, आयकर विभागाचे अतिरिक्त आयुक्त विश्वास मुंडे, पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, जिल्हा परिषदेच्या मुख्य



कार्यकारी अधिकारी संगीतादेवी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, शिक्षण विभागाचे शिक्षणाधिकारी चंद्रशेखर केकान, कृषी अधीक्षक बाबासाहेब जेजुरकर, आत्माचे प्रकल्प संचालक सुभाष साळवे, तहसीलदार सुहास हजारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

गायिका अभिलिप्सा पांडा यांनी आपल्या गायनाची सुरुवात ‘‘तू क्या भोले को चढायगा, भोला सबको देता हैं‘‘ या गाण्याने केली. तर ‘‘हर हर महादेव... शंभू हमारे‘‘, ‘‘हर हर शंभो...‘‘, ‘‘बोलो जय सियाराम...‘‘, ‘‘राधा राणी लागे, महाराणी लागे...‘‘, ‘‘शंभो शंभो कहती हैं‘‘ आदी गाणे गायली. इंडियाज गॉट टॅलेंट फेम क्रेझी डान्स ग्रुप दिल्ली यांनी अतिशय उत्साहात व जोशपूर्ण स्थितीत ‘‘जय जय हनुमान‘‘, ‘‘काल उसका क्या बिघाडे भक्त जो महाकाल का‘‘, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनावर बसविलेले ‘‘दुश्मन की देखो वाट लावली...‘‘, ‘‘ राम सियाराम सियाराम जय जय राम...‘‘आदी गाण्यावर सुंदर नृत्य सादर केले. यावेळी रामायणातील कथेवर नृत्य सादर करण्यात आले. जिल्हाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी ‘‘ राजा पंढरीचा‘‘ हा अभंग सादर केला. अश्विनी ये ना.... गुमू संगतीने माझ्या तू येशील का या मराठीतील लोकप्रिय गाण्याने जुन्या मराठी गाण्याने बीडकर मंत्रमुग्ध झाले. बीडमध्ये सुरू असलेल्या महासंस्कृती महोत्सवाला खासदार प्रितम मुंडे यांनी जिल्हा प्रशासनला, बीडच्या जनतेला आणि कार्यक्रम सादर करणाऱ्या कलाकारांना शुभेच्छा आणि धन्यवाद दिले. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, ग्रामविकास विभाग, कृषी विभाग व महिला आर्थिक विकास महामंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला होता. विभागीय सरस व कृषी महोत्सव आयोजन छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण (मल्टीपर्पज ग्राउंड) येथे सुरू आहे. एकाच ठिकाणी कृषीशी निगडित माहिती आणि महिला उद्योजकांनी तयार केलेल्या वस्तूंचे दालने मांडण्यात आलेली आहे. हे दालने १ मार्च २०२४ पर्यंत राहतील अधिक संख्येने येथे येणाऱ्या लोकांनी बचत गटातर्फे बनवलेल्या वस्तू खरेदी कराव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आलेले आहे.*

# जिल्हाधिकारी दीपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते सिव्हील हॉस्पिटलमध्ये कोणशीला उद्घाटन

बीड (जिमाका):- केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आयुष्यमान भारत इन्फ्रास्ट्रक्चर मिशन योजनेअंतर्गत जिल्हा रुग्णालय बीड येथे ५० खाटांची नवीन बांधकामाची मंजुरी प्राप्त झाली असून त्याचे कोनशीला उद्घाटन जिल्हाधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून संपन्न झाले.

यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक अशोक बडे, जिल्हा आरोग्य अधिकारी उल्हास गंडाळ, जिल्हा परिषद ग्रामीण विकासच्या प्रकल्प अधिकारी संगीता देवी पाटील, पुणे येथील नोडल अधिकारी श्री. जगताप, जिल्हा आरोग्य अधिकारी श्री कासट, श्री तांदळे, कार्यकारी अभियंता



नितीन खाडे तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे या विषयाची माहिती दिली. सुसज्ज असे ५० खाटांचे क्रिटिकल केअर हॉस्पिटल रुग्णांसाठी उपलब्ध करून देणार असल्याचे या वेळी सांगितले. ***

# परळीच्या प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचा महाशिवरात्र उत्सव

शिवप्रभूला दरमहिन्यातील चतुर्दशी प्रिय आहे. त्यात महाशिवरात्री अतिप्रिय आहे. माघ महिन्यात कृष्ण पक्षात चतुर्दशीला महाशिवरात्र असते. शिवपुराण, गरूडपुराण, पद्मपुराण, स्कंदपुराण, अग्निपुराणात शिवरात्रीच्या पावन पर्वाचा महिमा सांगितलेला आहे. या दिवशी शंकराच्या पिंडीला एक किंवा ११ बिल्वपत्र अर्पण करण्याचे महत्त्व आहे. गंध, पुष्प, धूप, दीप व नेवैद्य दाखवतात शिवाय यादिवशी उपवास, पूजाअर्चा करण्याचेही महत्त्व आहे. शिवरात्र म्हणजे शिव आणि शक्तीच्या मिलनाचे महापर्व होय. असे काही भाविक सांगतात. आदिदेव भगवान शंकर कोट्यवधी सूर्याच्या तेजा इतक्या महातेजस्वी लिंगाच्या स्वरुपात प्रकट झाले असे सांगतात तर शिवपुराणात शंकराच्या निराकार स्वरूपाचे प्रतीक असणारे लिंग याच तिथीला प्रकट झाले आणि सर्व प्रथम ब्रम्हा आणि विष्णू यांनी त्यांची पूजा केली. त्यामुळे ही तिथी शिवरात्र म्हणून प्रसिद्ध झाली.

महाशिवरात्रीला केलेल्या शिवपूजेने वर्षभर शिवपूजा केल्याचे फळ मिळते, अशी मान्यता आहे. शंकराच्या आराधनेसाठी केल्या जाणाऱ्या सर्व व्रतवैकल्यांमध्ये महाशिवरात्रीचे स्थान सर्वोच्च आहे. यासारखे दुसरे व्रत नाही. या दिवशी भगवान शंकर सर्व शिवलिंगामध्ये संचार करतात म्हणून या दिवसाचे महत्त्व आहे. म्हणून कोणत्याही शिवालयात जाऊन शिवरात्रीला महादेवाची पूजाअर्चा करावी. हा दिवस पृथ्वीच्या उत्पत्तीचा, शिवपार्वती विवाहाचा मानला जातो. हरिणांना



मृगनक्षत्र व पारध्यांना व्याघ्र नक्षत्र म्हणून आकाशात स्थान मिळाले तो दिवस शिवरात्रीचा.

देशभरातील बारा ज्योतिर्लिंगापैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून भाविकांत ख्याती असलेल्या परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) येथील प्रभू श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचा महाशिवरात्रीला मोठा उत्सव असतो. पाच दिवस चालणाऱ्या या उत्सवाची तयारी कितीतरी दिवस अगोदर मंदिरात सुरू असते. मंदिराची रंगरंगोटी, साफसफाई केली जाते. महाशिवरात्रीला भरणाऱ्या वार्षिक यात्रा उत्सवात लाखो भाविक ‘श्रीं’ चे दर्शन घेतात. महाशिवरात्रीदिनी भल्या पहाटे श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची नित्यपूजा होवून सर्वसामान्य भाविकांसाठी खुले होते. भल्या पहाटेपासून दूरपर्यंत दर्शनासाठी शिवभक्तांच्या रांगा लागलेल्या असतात. परगावाहून येणाऱ्या भाविकांची संख्या लक्षणीय असते. यावेळी शिवनामाचा जयघोष केला जातो. ‘हर हर महादेव, श्री वैद्यनाथ महाराज की जय!’ या जयघोषाने मंदिर परिसर दणाणून जातो. यादिवशी मंदिरात दीपमाळेवरील प्रांगणात दिवसभर सनई, चौघड्याचा मंजूळ स्वर निनादत असतो. शिवाय विविध अगरबत्ती उत्पादक कंपन्यांकडून दरवर्षी महाअगरबत्ती येथे लावली जाते. ही अगरबत्ती दिवसभर चालते. या अगरबत्तीच्या दरवळणाऱ्या सुगंधामुळे मंदिर परिसरातील वातावरण प्रसन्न होते. यांसह मंदिरात यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दरम्यान, मंदिरावर विद्युत रोषणाई केली जाते. यामुळे मंदिर परिसर दिव्यांनी उजळून जातो. महाशिवरात्रीला सुमारे तीस तासापर्यंत दर्शन चालते. या दिवशी सायंकाळी जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते श्री वैजनाथाची शासकीय रुद्राभिषेक पूजाही केली जाते. त्यानंतरच सर्वसामान्य भाविकांकडून महाशिवरात्रीला अभिषेक पूजा केली जाते. शेकडो महिला भाविक या दिवशी मंदिर परिसरात ‘शिवरात्रवात’ पाजळतात. ही येथे जुनी प्रथा आहे. परळी परिसरातील जिरेवाडी येथील शिव श्री सोमेश्वराची पालखी वाजतगाजत महाशिवरात्रीला श्री वैद्यनाथाच्या म्हणजे आपल्या भावाच्या भेटीला मंदिरात येते. हजारो भाविक यावेळी उपस्थित असतात. या शिवाय शहरातील संत जगमित्रनागा व सोपानकाका यांच्या दिंड्याही या दिवशी वैद्यनाथाच्या दरबारी येतात. येथे शेकडो वर्षाची ही परंपरा आहे. शिवरात्रीच्या दुसऱ्या दिवशी वैद्यनाथ मंदिरात भजन, कीर्तन, प्रसाद वाटपाचा कार्यक्रम होतो तर तिसऱ्या दिवशी श्री वैजनाथ ज्योतिर्लिंगाची पारंपरिक पद्धतीने शहरातून पालखी मिरवणूक निघते. पालखी मिरवणुकीला सुरूवात होण्यापूर्वी दक्षिणमुखी श्री गणेशाची पूजा होते. पालखी गावातील देशमुखपारावर आल्यानंतर तिथे भक्तिगीत गायनाचा कार्यक्रम होतो. त्यानंतर सरस्वती नदीत शोभेची दारू उडवली जाते. नांदूरवेस, गणेशपार भागात पालखीपुढे कलावंतांच्या हजेरीचा कार्यक्रम होतो. यावेळी स्थानिक कलावंत संगीत रचना सादर करतात. गावभर पालखी मिरवून सायंकाळी उशिरा मंदिरात परतते. शहरात पालखी मार्गावर भाविकांकडून सडा टाकला जातो, रांगोळी काढली जाते. शेकडो भाविक यावेळी पालखीचे दर्शन घेतात. पूजा करतात. देव आपल्या दारी आल्याचा मोठा आनंद यावेळी परळीकरांना होतो. या पालखी मिरवणुकीने यात्रा उत्सवाची सांगता होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मंदिरात महाशिवरात्र व पालखीवेळी सेवा करणाऱ्या सेवेकऱ्यांना देवस्थान संस्थेतर्फे बिदागी देण्याचा व महाप्रसादाचा कार्यक्रम होतो. महाशिवरात्रीला लाखो भाविक परळीत दर्शनाला येतात. भाविकांच्या सोयीसाठी परळी पालिका, देवस्थान संस्थान विविध उपक्रम राबवते. त्याच बरोबर शहरातील विविध सामाजिक संस्था, व्यापारी, उद्योजक, सर्वसामान्य नागरिकही भाविकांसाठी मोफत फराळ वाटतात. जागोजागी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली जाते. मदत केंद्रही चालवले जाते. लाखो भाविक या सेवेचा लाभ घेतात. या महोत्सवात मोठा जनसागर उसळत असल्याने सबंध परळी शहर शिवभक्तीमय होते. परळीचा असा हा महाशिवरात्री उत्सव शिवभक्तांच्या दृष्टीने महत्वाचा व तेवढाच मोठा आहे.

**- लक्ष्मण वाकडे, पत्रकार,**
परळी वैजनाथ.